N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

छावणी पोलीस स्टेशन मालेगांव (नाशिक)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण  **P.S.(ठाणे):** मालेगांव छावणी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0230  **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/08/2024 21:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)(अ) |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | ४०९ |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | ४२० |
| 4 | भारतीय दंड संहिता १८६० | ४६८ |
| 5 | भारतीय दंड संहिता १८६० | ४७१ |
| 6 | भारतीय दंड संहिता १८६० | ३४ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन  **Date From (दिनांक पासून):** 27/01/2012
**Time Period (कालावधी):**  **Date To ( दिनांक पर्यंत):** 20/06/2012
**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/08/2024  **Time (वेळ):** 00:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 018
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/08/2024 20:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी



Scanned with OKEN Scanner

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

दक्षिण, 3 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): मालेगांव महानगर पालिकेचे हद्दीत,मालेगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): नितीन नारायण पाटील

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1978

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक परिक्षेत्रीय कार्यालय, न,नाशिक शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पत्ता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक परिक्षेत्रीय कार्यालय, न,नाशिक शहर, महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9284661658

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कैलास राजाराम बच्छाव | | | 1. सुर्योदय कॉलनी अर्चना अपार्टम, मालेगाव ,मालेगाव कॅम्प,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | मुरलीधर हरी देवरे | | | 1. विजय कॉलनी सटाणा नाका , मालेगाव ,मालेगांव छावणी, नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 3 | संजय जनार्दन जाधव | | | 1. प्रसन्न निवास वीर सावरकर नगर ,मालेगाव कम्प,मालेगाव कॅम्प, नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 4 | राजेंद्र काशिनाथ बाविस्कर | | | 1. सर्वे नं 199/ A,श्रीरथ ऑटो कलेक्टर पट्टा,मालेगाव ,मालेगांव छावणी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 5 | सोहेल अब्दुल रहेमान मासुमअली शाह | | | 1. मालेगाव,मालेगांव छावणी, नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 6 | दिनेश आनंदराव जगताप | | | 1. आनंदनिवास आंबेडकर चौक , संगमेश्वर ,मालेगाव ,मालेगांव छावणी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 7 | निलेश हिरामण जाधव | | | 1. रुम नं 92/93 ,रुक्मिणी नगर लोखंडे मळा जेल रो.,नाशिक रोड नाशिक ,नाशिक रोड,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |
| 8 | अशोक ओंकार म्हसदे | | | 1. पाटलीपुत्र निवास सर्वे नं 71 , मालेगाव कम्प मालेगाव ,मालेगाव कॅम्प,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 9 | सुहास वसंत कुलकर्णी | | | 1. वसंत विहार महालक्ष्मी कॉलनी भ,भायगाव रोड मालेगाव , मालेगांव तालुका,नाशिक ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 10 | कमरुद्दीन शमशुद्दीन शेख | | | 1. घर नं 250 शनिवार वार्ड , वदांवन चौक ,मालेगाव ,मालेगांव छावणी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 11 | सुनिल दत्तात्रय खडके | | | 1. फ्लट नं 2 वंदन प्लाझा ,निसर्ग हॉटेल समोर संगमेश्वर ,मालेगाव ,मालेगांव छावणी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 12 | मधुकर अशोक चौधरी | | | 1. सर्वे नं 202 प्लॉट नं 10 , नानावटी पेट्रोलपंप मागे,कलेक्टर |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | पट्टा मालेगाव ,मालेगांव छावणी, नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 13 | उत्तम माधवराव कावडे | | | 1. फलट नं 10 ,जनक प्राईड सदाशिव नगर ,गोविंद नगर नाशिक ,उपनगर,नाशिक शहर, महाराष्ट्र,भारत |
| 14 | केदा रामदास भामरे | | | 1. दाभाडी मालेगाव ,मालेगांव छावणी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 15 | कष्णा वळवी मयत | | | 1. मालेगाव,मालेगांव छावणी, नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तकारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

छावणी पोलीस ठाणे,मालेगांव

दिनांक 26/08/2024

मी नितीन नारायण पाटील, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रीय कार्यालय, नाशिक

समक्ष हजर राहुन सरकार तर्फे फिर्याद लिहुन देतो की, अर्जदार श्री. तुशार शिवाजी पाटील, माहिती अधिकार कार्यकर्ता, रा. मरीमाता मंदीर, मोहनबाब नगर, मालेगांव, जि. नाशिक यांनी गै.अ. मालेगांव मनपा मधील तत्कालीन आयुक्त व इतर अधिकारी/कर्मचारी यांचेविरूध्द केलेल्या तक्रारी अर्जात ''महानगर पालिका हद्दीतील 1) स्टेट बँक एरीया, 2) 60 फुटी रोड, 3) सत्यम शिवम सुंदरम अपार्टमेंट मागे गटारीचे बांधकाम करण्यासाठी 46,00,172/- रूपयांची मंजुरी मिळाली होती. सदर बांधकाम करण्यासाठी बी. वाय.शहा या मक्तेदारास काम देण्यात आले होते. परंतु मक्तेदार यांनी संगनमत करून 60 फुटी रोड येथे एकाच ठिकाणी निकृश्ठ व अर्धवट गटारीचे बांधकाम केले आहे. स्टेट बँक एरिया व सत्यम षिवम सुंदरम अपार्टमेंट मागे अशा दोन भागात गटार बनविण्याचे काम झाले नसतांना 8 महिन्यात संपुर्ण बिल देना बँकेच्या शहर शाखेतुन मनपाच्या खात्यावरून मक्तेदाराला अदा करण्यात आले आहे. त्रयस्थ संस्थेकडुन ऑडीट करून बांधकाम चांगल्या पध्दतीचे व पुर्ण झाल्याचा अहवाल घेण्यात आला आहे. तसेच शहर अभियंता व उप अभियंता यांनी तिन्ही ठिकाणांपैकी एकाच ठिकाणी निकृश्ठ व अर्धवट काम झाले असतांना काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. गै.अ. मनपा मालेगांव येथील संबंधीत अधिकारी, कर्मचारी व खाजगी व्यक्ती यांचेकडुन मक्तेदाराच्या करारनाम्यावर दुस-या व्यक्तीचा फोटो लावुन संबंधीत व्यक्तीचा बोगस करारनामा तयार करण्यात आला आहे. एकाच कामाचे एकाच करारनाम्यावर दोन वेगवेगळ्या व्यक्तींचे फोटो लावुन बोगस करारनामा तयार करून त्यात अफरातफर करून मालेगांव महानगर पालिकेची फसवणुक केली आहे.'' बाबत आक्षेप नमुद केले होते.



Scanned with OKEN Scanner

अर्जदार यांचे प्राप्त तक्रारी अर्जावरुन गै.अ. मालेगांव मनपा मधील तत्कालीन आयुक्त व इतर अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द मा.मुख्यालयाने प्रस्तुत प्रकरणी मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील जा.क्र.चौ.उघड/93/नाषिक/2020 दि. 03/08/2020 या आदेषान्वये मालमत्तेची उघड चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याअनुशंगाने तत्कालीन पो.नि.एच.एस.भामरे यांनी प्रस्तुत प्रकरणात मालमत्तेची उघड चौकशी केली असुन, त्यानंतर प्रस्तुत प्रकरण हे पो.नि.एच.एस.भामरे यांचेकडुन पो.नि. अनिल बागुल यांचेकडे कार्यभारात माहे जुन 2021 मध्ये प्राप्त झालेले आहे. त्याप्रमाणे पो.नि. अनिल बागुल यांनी अर्जामधील आक्षेपांच्या अनुशंगाने मा. आयुक्त, महानगर पालिका, मालेगांव, जि. नाषिक यांचेषी वेळोवेळी पत्र व्यवहार करून तक्रारी अर्जात नमुद मालेगांव महानगर पालिका हद्दीतील 1) स्टेट बँक एरीया, 2) 60 फुटी रोड, 3) सत्यम षिवम सुंदरम अपार्टमेंट मागील गटार बांधकामाचे संदर्भातील संपुर्ण कागदपत्र त्यात (वर्क ऑर्डर, टेंडर, मोजमाप पुस्तिका, थर्ड पार्टी टेक्निकल ऑडीट, अदा केलेल्या देयकांची माहिती, धनादेष नोंदणी रोकड वही) इत्यादी कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रती प्राप्त केल्या आहेत, तसेच प्रस्तुत प्रकरणाच्या अनुशंगाने मालेगांव महानगर पालिका येथील बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचारी, स्थानिक रहीवाषी नागरिक श्री विजय रमेष परदेषी, श्री देवीदास खंडु पाटील, श्री भारत देवराम भावसार, श्री नंदलाल घेवरचंद बाफना, श्री ओमप्रकाश मोतीलाल हेडा, नमुद गटारीचे बांधकाम झाल्यानंतर सदर ठिकाणी दुरूस्ती करणारे, नवीन गटार बांधनारे ठेकेदार श्री मयुर वंजी दुसाने, श्री प्रतिष वामनराव भुसे, तसेच श्री. जिवन सोनवणे, तत्कालीन आयुक्त, मालेगांव महानगर पालिका यांच्याकडे तसेच बी. वाय. शहा फर्मचे प्रतिनिधी श्री. शाबानअली मासुमअली शाह व तक्रारीत नमुद गटारीचे काम करणारे श्री. सोहेल अब्दुल रहेमान मासुमअली शाह यांच्याकडेही विचारपुस करण्यात आली आहे.

तसेच सदर प्रकरणातील तक्रारदार अर्जदार श्री. तुषार पाटील यांनी तक्रारीत नमुद बांधकाम करण्यात आलेल्या गटारींचे ठिकाणी नव्याने गटारीचे बांधकाम करण्यात आलेबाबतचे कागदपत्र माहिती अधिकारामध्ये सादर केल्यानंतर संबंधीत ठेकेदार श्री विजय विठठल काळे, अकील उर्फ अन्सारी अहमद अब्दुल खालीक यांचेकडेही विचारपुस करण्यात आली आहे.

तसेच गटारांची पाहणी होवुन तांत्रिक तपासणी अहवाल मिळणे, सदर कामात शासकीय निधीचा किती अपव्यय झाला आहे? अगर किती प्रमाणात नुकसान झाले आहे. बाबत मा. अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक यांना पत्रव्यवहार केला आहे. दरम्यान पोनि अनिल बागुल यांची बदली झाल्याने त्यांचेकडील अभिलेखाचा कार्यभार हा आमच्याकडे देण्यात आल्याने, प्रस्तुतचे प्रकरण माहे जुलै 2023 मध्ये आमचेकडे कार्यभारात प्राप्त झाले होते.

सदर चौकशी प्रकरणाचे अवलोकन करता चौकशी प्रकरणात श्री. संदीप वामनराव पारनेरकर, तत्कालीन सहा. लेखा परिक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, औरंगाबाद यांचा अहवाल प्राप्त झाला असुन, त्यात त्यांनी खालील प्रमाणे त्रूटी नमुद केल्या असल्याचे दिसुन येत आहेत.

1) संबंधीत कामाची निविदेची दरसुची हि सन 2008-2009 नुसार असतांना मक्तेदाराने सन 2010-2011 नुसार सषर्त निविदा दर सादर केलेले आहेत.

2) अंदाजपत्रकीय दराशी निविदा दराशी तुलना करतांना 11.31 टक्क्याऐवजी खोदकाम, षहाबादी फरषी पुरवठा व बसविणे, टीएमटी स्टील इ. बाबींचे दर ज्यादा दर्षवुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने म्हणजेच 15.47 जास्त दराने असे एकुण 1,77,164/- अतिप्रदान करण्यात आले आहे.

3) नियमानुसार 500 घनमिटर पेक्षा जास्त खोदकाम मानवी दराने न करता यांत्रिकी दराने करणे आवश्यक असतांना सदर प्रकरणात 2093.45 घनमिटर खोदकाम हे मानवी दराने करण्यात आले आहे. त्यामुळे रक्कम रू. 55,598/- इतके अतिप्रदान करण्यात आले आहे.

4) कामासाठी वापरण्यात आलेल्या बांधकाम साहित्याची रॅायल्टी रक्कम रू. 41,550/- कपात करून शासनास भरलेली नाही.

5) कामगार कल्याण उपकर रक्कम रू. 49173/- कपात करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात रक्कम रू. 13022/- इतर रक्कम वसुल केल्याने शासनाचे 36,154/- रूपयांचे नुकसान झालेले आहे.

सदर कामात अशी एकुण 3,10,466/- रू. ची वसुली दर्षविण्यात आलेली आहे.

6) सदर कामाशी संबंधीत विभागीय आयुक्त कार्यालयाकडील प्रशासकीय मंजुरी आदेषात नमुद असलेले मुद्दे क्र. 2, 5 व 6 ची पुर्तता केलेली नाही.

7) सदर कामाशी संबंधीत करारनामा प्रमाणीत अटीशर्ती असलेला विहित नमुना बी 1 मध्ये भरून घेण्यात आलेला नव्हता. अशा त्रुटी नमुद केल्या आहेत.

तसेच आम्ही प्रस्तुत चौकशीच्या अनुशंगाने मा. अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक



Scanned with OKEN Scanner

यांचेकडील प्राप्त तपासणी अहवालात मालेगांव महानगर पालिका हद्दीतील स्टेट बँक एरीया, 60 फुटी रोड या ठिकाणी बांधकाम करण्यात आलेल्या गटारीचे बांधकाम हे अंदाजपत्रकात नमुद असल्याप्रमाणे केलेले नसुन काही ठिकाणी बांधकाम करण्यात आलेले नाही तसेच सदर गटारीचे बांधकाम करतांना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आलेले असुन त्याअनुशंगाने शासकीय निधीचा किती अपव्यय झाला आहे? अगर किती प्रमाणात नुकसान झाला आहे याबाबत स्पष्ट अभिप्राय मिळणेकामी तसेच सदर प्रकरणातील गटारीचे बांधकामाचे आयुष्य किती याबाबत पत्र देण्यात आले. असता मा. अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक यांचा अहवाल प्राप्त झाला असुन, सदर अहवाला मध्ये -

1) गटार आढळुन न आलेली लांबी 181.60 मीटर
2) दगडी कॉक्रीट बांधकामातील जुनी/नवीन गटार 1823.60 मीटर (सदर लांबीत विटकामाचे काम असणे अपेक्षित होते)
3) अंदाजपत्रकानुसार गटरीच्या 1 मीटर लांबीकरीता धरण्यात आलेला सर्वसाधारण खर्च रू. 1424/- प्रती मीटर
4) 1823.60 मीटर लांबीमध्ये अंदाजपत्रकानुसार काम न करण्यात आल्यामुळे तसेच झालेले काम हे नवीन किंवा जुने असल्याबाबत संदिग्धता असल्याने 1 मीटर लांबीकरीता झालेला नुकसानीचा दर 1424/2 प्रती 712 रुपये (सदर दर हा अंदाजे देण्यात आला आहे)

अ.क्र. गटारीची लांबी नुकसानीचा दर एकुण नुकसान शेरा
1 181.60 मी. रू. 1424/-रू. 2,58,598/- गटार आढळुन न आलेली लांबी
2 1823.60 मी. 712/- रू. 12,98,403/- अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार नसलेली तसेच जुनी किंवा नवी बाबत संदिग्धता असलेली लांबी
एकुण रू. 15,57,001/- सर्वसाधारणपणे अपव्यय झालेली एकुण रक्कम

तसेच गटारीचे सर्वसाधारण आयुश्य हे विविध बाबींवर अवलंबुन आहे. जसे की सदर गटारीचे प्रकार (Strom Water / drainage water) गटारीची जाडी, गटारीसाठी वापरण्यात आलेले साहित्यांची गुणवत्ता, चुना अथवा सिमेंटचा वापर, बांधकाम करताना घेण्यात आलेली काळजी, वेळोवेळी करण्यात आलेली दुरूस्ती इत्यादी.'' बावत विचार करता, 1) विट बांधकाम करण्यात आलेल्या गटारीचे सर्वसाधारण आयुष्य - 25 वर्षे, 2) कॉक्रीट बांधकाम करण्यात आलेल्या गटारीचे सर्वसाधारण आयुश्य - 60 वर्षे, 3) दगड बांधकामात करण्यात आलेल्या गटारीचे सर्वसाधारण आयुश्य - 35 वर्षे, असा अहवाल देवुन सर्वसाधारणपणे सदर कामात एकुण रक्कम रू. 15,57,001 /-चा अपहार झाला असल्याचा स्पश्ट लेखी अहवाल प्राप्त झाला आहे.

अशा प्रकारे सदर उघड चौकशी प्रकरणात असे निष्पन्न होत आहे की, मालेगांव महानगर पालिका येथील अधीकारी 1) श्री. कैलास राजाराम बच्छाव, शहर अभियंता 2) श्री. मुरलीधर हरी देवरे (सेवानिवृत्त), तत्कालीन कनिश्ठ अभियंता 3) श्री. संजय जनार्दन जाधव, तत्कालीन कनिश्ठ अभियंता 4) श्री. राजेंद्र काशिनाथ बाविस्कर (सेवानिवृत्त) तत्कालीन उप अभियंता, यांनी ठेकेदार यांच्याशी संगनमत करुन

I ) सोयस्करदृश्टया कागदपत्रे न पाहता प्रत्यक्ष कामापेक्षा मोठया प्रमाणावर रक्कम अदा करणे.

II) प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी काम झालेले नसतांना पुर्ण रक्कमेची बिले, मोजमाप नोंदी घेवुन प्रमाणीत केले. जेणे करुन ठेकेदारास आर्थिक लाभ मिळवुन देण्यात आला आहे. यात शासनाचा निधी असल्याने शासनाची आर्थीक फसवणुक करण्यात आलेली आहे.

III) प्रत्यक्ष काम झालेल्या ठिकाणी मुळ मंजुरीनुसार बांधकाम न करुन घेता ते झाले असे भासवुन खोटे अभिलेख तयार करुन, पदाचा गैरवापर करुन ठेकेदारास गैरलाभ मिळवुन व षासनाची फसवणुक केली आहे.

IV) शहर अभियंता यांची सर्व कामे पार पाडणेकामी व बिले अदा होणे पावेतो कामाची गुणवत्ता, प्रत्यक्ष काम व कागदपत्रे तपासण्याची तांत्रीक जबाबदारी असल्याने त्यांनी जागेवर काम झालेले नसतांना काम झाल्याचे अभिप्राय स्वाक्षरीत केल्याचे दिसुन येत आहे.

V) तसेच मालेगांव महानगर पालिकेतील बिल तपासणी कामी संबंधीत अधिकारी, कर्मचारी 5) श्री. निलेष हिरामण जाधव, तत्कालीन कनिष्ठ लिपिक, मालेगांव महानगर पालिका 6) श्री. अषोक ओंकार म्हसदे,तत्कालीन लेखा परिक्षक(सेवानिवृत्त), मालेगांव महानगर पालिका 7) श्री. सुहास वसंत कुलकर्णी, तत्कालीन कनिष्ठ लिपिक, मालेगांव महानगर पालिका 8) श्री. कमरूद्दीन शमशुद्दीन शेख, तत्कालीन लेखा अधिकारी (सेवानिवृत्त), मालेगांव महानगर पालिका 9) श्री. सुनिल दत्तात्रय खडके, तत्कालीन कनिश्ठ लिपिक, मालेगांव महानगर पालिका 10) श्री. मधुकर अशोक चौधरी, कनिष्ठ लिपिक, (सेवानिवृत्त), मालेगांव महानगरपालिका 11) श्री. उत्तम माधवराव कावडे, मुख्य लेखा परिक्षक (सेवानिवृत्त), मालेगांव महानगर पालिका 12) श्री. केदा रामदास भामरे, कनिष्ठ लिपिक, मालेगांव महानगर पालिका यांनी देखील कागदपत्रे परिपुर्ण नसतांना आणि मोजमाप पुस्तीकेतील नोंदी अपुर्ण



Scanned with OKEN Scanner

असतांना त्यावर विभागास विचारणा न करता सरळ बिल अदा करण्यासाठी अहवाल दिलेला दिसुन येत आहे.

VI) शासन निधीचा योग्य प्रकारे विनीयोग होण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांची असल्याने त्यांनी या प्रकरणात तत्कालीन उपायुक्त 13) श्री क VI) शासन निधीचा योग्य प्रकारे विनीयोग होण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांची असल्याने त्यांनी या प्रकरणात तत्कालीन उपायुक्त 13) श्री कृष्णा वळवी (मयत) यांना बिल अदा अधिकार दिले असल्याने तत्कालीन उपायुक्त श्री कृष्णा वळवी (मयत) यांनी देखील प्रत्यक्ष कामावर झालेला खर्च आणि मोजमाप नोंदी तपासुन पाहणे ही त्यांची प्रशासकीय जबाबदारी असतांना त्यांनी देखील त्यात सामील होवुन अपहार केल्याचे दिसुन येत आहे.

VII) प्रत्येक कामावर ठेकेदार स्वतः केलेला खर्च हा, कामाच्या नोंदी घेवुन, हिषोबासाठी जतन करतो, ही सहज प्रवृत्ती असते, या कामात सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या प्रत्यक्ष जागेवरील तपासणी नुसार खुपच कमी काम झाल्याचे स्पष्ट झाले आहे. म्हणजेच कनिष्ठ अभियंता, शहर अभियंता व उप अभियंता यांनी संगनमताने प्रत्यक्ष जागेवर काम झालेले नसतांना, जास्तीची रकमेची बिले नोंदविण्यात आली असता, ठेकेदाराने 14) श्री सोहेल अब्दुल रहेमान मासुमअली षाह, बांधकाम व्यावसायीक, मालेगांव यांनी त्यावर स्वाक्षरी करुन आर्थीक अपहारात सहभागी असल्याचे उघड आहे. तसेच त्यानंतर त्याच नोंदीवर लिपीक, लेखाधिकारी आणि मुख्य लेखापरिक्षक यांनी बिले अदा केल्याने संपुर्ण संघटीत पध्दतीने तंत्रषुध्द आर्थिक गुन्हा घडलेला आहे.

VIII) शासनाने त्रयस्त पक्ष तपासणी करणेकामी शासकीय तंत्रनिकेतन यांचा रिपोर्ट घेण्यास सांगीतले असतांना, KBH Polytechnic यांचे तर्फे संबधीत 15) श्री दिनेश आनंदराव जगताप, विभाग प्रमुख, के.बी.एच. पॉलेटेक्नीक, मालेगांव यांनी देखील कामाची गुणवत्ता तपासुन आणि जागेवर काम झालेले नसतांना, गुणवत्ता पुर्ण काम झाल्याचे दाखले प्रमाणीत केले आहेत व सदर दाखल्याचा आधार घेवुनच बिले अदा करण्यात आल्याचे दिसुन येत आहे.

IX) मोजमाप पुस्तीकेत प्रत्यक्ष काम झाल्याचा नोंदी घेवुन प्रमाणीत करणे, ते बिल अदा करणे या संपुर्ण प्रक्रीयेत KBH Polytechnic शासनाचे मुख्य लेखापरिक्षक, मनपा उपायुक्त हे जबाबदार व्यक्ती असतांना त्यांनी केवळ शहर अभियंता यांनी दिलेल्या अहवालाच्या आधारे बिले अदा करणेस मदत केल्याने हया संपुर्ण प्रकरणात कनिश्ठ अभियंता, उप अभियंता, शहर अभियंता यांच्याशी ठेकेदाराने संगनमत केल्याचे व यात संपुर्ण प्रशासकीय यंत्रणा सामील झाल्याचे या दवारे उघड होत आहे. म्हणजेच जर तक्रार प्राप्त झाली नसती तर या प्रकारे शासनाचा निधीचा अपहार झाल्याचे निदर्शनास येणे अशक्य राहील असा निर्धार करुन कागदोपत्री स्वच्छ कामकाज दाखवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येत आहे. मात्र मा. अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक यांचे निरीक्षण अहवालावरुन प्रत्यक्ष काम व भ्रष्टाचार अपहार विशद होण्यास मदत झाली आहे.

X) तसेच मा. अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाषिक यांचे निरीक्षण अहवालाचे बारकाईने निरीक्षण करता, त्यांचे अहवाला प्रमाणे एकुण 281.60 मीटर गटारीचे बांधकाम आढळुन आल्यांचे दिसुन येत नसल्याने, मिटरचे 1424 रु चे दराने एकुण रक्कम रू. 4,00,998/- ची आढळुन न आलेल्या गटारीची रक्कम,

XI) श्री संदीप वामनराव पारनेरकर, तत्कालीन सहा. लेखा परिक्षा अधिकारी यांनी लेखा परिक्षण दरम्यान ठेकेदार यांचेकडुन वसुल करणे आवष्यक असल्याचे दाखलविलेलली, जी तत्कालीन षहर अभियंता, श्री कैलास बच्छाव यांनी वसुल करणे आवष्यक होते. परंतु अदयाप ठेकेदार यांचेकडुन वसुल न करण्यात आलेली 3,10,466 /- रु, रक्कम.

XII)तसेच चौकषीत निश्पन्न झाले आहे की, ठेकेदार श्री सोहेल अब्दुल रहेमान मासुमअली षाह यांनी मालेगांव महानगरपालिका हद्यीतील प्रभाग क्र. 11 बारा बंगला येथील डॉ. मुळे हॉस्पिटल ते टी. पी. देवरे हॉस्पिटल पावेतो, मार्केट कंम्पाऊंडला लगत व प्रभाग क्र. 11 मधील रूक्मिणी अपार्टमेंट ते 60 फुटी रोड व 60 फुटी रोडलगत असलेल्या केषवपार्क परिसरामध्ये गटारीचे, प्रभाग क्र. 9 मधील 12 बंगला ते जैन मंदीराजवळ, मालेगांव कॅम्प परीसरातील संजय गाधी नगर परीसर अषी एकुण 953.05 मीटर 1424 रु मिटरचे दराने रक्कम रू. 13,57,143/- चे बांधकाम केलेले नाही. असा एकुण 20,68,607/- रु. चा अपहार केल्याचे प्रथमदर्षनी निश्पन्न होत आहे.

एकंदरीत सदरचा गुन्हा हा दिनांक 27/01/2012 ते दिनांक 20/06/2012 रोजीच्या दरम्यान मालेगांव महानगर पालिकेचे हददीतील 1) स्टेट बँक एरीया, 2) 60 फुटी रोड, 3) सत्यम षिवम सुंदरम अपार्टमेंट मागे या ठिकाणी घडलेला असुन, मालेगांव महानगर पालिकेचे अधिकारी व कर्मचारी1) श्री. कैलास राजाराम बच्छाव, शहर अभियंता 2) श्री. मुरलीधर हरी देवरे (सेवानिवृत्त), तत्कालीन कनिश्ठ अभियंता 3) श्री. संजय जनार्दन जाधव तत्कालीन कनिश्ठ अभियंता व 4) श्री. राजेंद्र काशिनाथ बाविस्कर (सेवानिवृत्त) तत्कालीन उप अभियंता, यांनी स्वतःचे पदाचा व अधिकारांचा दुरूपयोग करून, गटारीचे बांधकाम हे अंदाजपत्रकात नमुद विट



Scanned with OKEN Scanner

बांधकामात न करता त्याबाबत वरिष्ठांना कोणत्याही प्रकारे माहिती न देता परस्पर कामात बदल करून सदर गटार हि कॉक्रीट व दगडी बांधकामात करून बी. वाय. षाह फर्मचे ठेकेदार 5) सोहेल अब्दुल रहेमान मासुमअली षाह यांनी मालेगांव महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. 11 बारा बंगला येथील डॉ. मुळे हॉस्पिटल ते टी. पी. देवरे हॉस्पिटल पावेतो, मार्केट कंम्पाऊंडला लगत व प्रभाग क्र. 11 मधील रूक्मिणी अपार्टमेंट ते 60 फुटी रोड व 60 फुटी रोडलगत असलेल्या केशवपार्क परिसरामध्ये गटारीचे, प्रभाग क्र. 9 मधील 12 बंगला ते जैन मंदीराजवळ, मालेगांव कॅम्प परीसरातील संजय गाधी नगर परीसर अषी एकुण 953.05 मिटर हे 1424 रु मिटरचे चे दराने एकुण रक्कम रू. 13,57,143/- चे बांधकाम न केलेले असतांना देखील त्याबाबत मोजमाप पुस्तिकेमध्ये खोटया नोंदी घेवुन त्या प्रमाणीत केल्या असल्याबाबत चौकशी दरम्यान निष्पन्न झालेले आहे. तसेच 6)श्री दिनेश आनंदराव जगताप, विभाग प्रमुख, के.बी.एच. पॉलेटेक्नीक, मालेगांव यांनी देखील जागेवर काम झालेले नसतांना कामाची गुणवत्ता आणि काम झाल्याचे दाखले प्रमाणीत केले आहेत व सदर दाखल्याचा अधार घेवुनच बिले अदा करण्यात आल्याचे दिसुन येत आहे.

तसेच मालेगांव महानगर पालिकेतील बांधकाम विभाग व लेखा षाखेतील 7) श्री. निलेष हिरामण जाधव, तत्कालीन कनिश्ठ लिपिक, मालेगांव महानगर पालिका 8) श्री. अषोक ओंकार म्हसदे,तत्कालीन लेखा परिक्षक (सेवानिवृत्त), मालेगांव महानगर पालिका 9) श्री. सुहास वसंत कुलकर्णी, तत्कालीन कनिष्ठ लिपिक, मालेगांव महानगर पालिका 10) श्री. कमरूद्दीन शमशुद्दीन शेख, तत्कालीन लेखा अधिकारी (सेवानिवृत्त), मालेगांव महानगर पालिका 11) श्री. सुनिल दत्तात्रय खडके, तत्कालीन कनिश्ठ लिपिक, मालेगांव महानगर पालिका, 12) श्री. मधुकर अषोक चौधरी, कनिष्ठ लिपिक, (सेवानिवृत्त), 13) श्री. उत्तम माधवराव कावडे, मुख्य लेखा परिक्षक (सेवानिवृत्त), मालेगांव महानगर पालिका 14) श्री. केदा रामदास भामरे, कनिष्ठ लिपिक, मालेगांव महानगर पालिका यांनी देखील स्वतःचे पदाचा व अधिकारांचा दुरूपयोग करून त्यांना नेमुण दिलेले काम न करता बी. वाय. शाह फर्मचे ठेकेदार सोहेल अब्दुल रहेमान मासुमअली शाह यांचे सदर गटार कामांची वेळोवेळी देयके सादर झाल्यानंतर गटारीचे बांधकामा संदर्भातील गटारीचे विशिष्ठ ठिकाण कोणते व कोठे व त्याची लांबी किती आहे, तसेच मोजमाज पुस्तिकेमध्ये एकत्रितरित्या घेतलेल्या नोंदी यामुळे कोणत्या ठिकाणी किती काम झालेबाबत योग्य निश्कर्श न लावता तसेच झालेल्या कामाचे फोटोग्राफ्स का सादर करण्यात आले नाही? याबाबत त्रुटी न काढता तसेच इतर कायदेषीर त्रुटी न काढता देयके पारीत करून, शासन निधीचा योग्य प्रकारे विनीयोग होण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांनी तत्कालीन उपायुक्त श्री. कृष्णा वळवी (मयत) यांना जबाबदारी देवुन बिल अदा करण्याचे अधिकार दिले असल्याने तत्कालीन उपायुक्त 15) श्री. कृष्णा वळवी (मयत) यांनी देखील प्रत्यक्ष कामावर झालेला खर्च आणि मोजमाप नोंदी तपासुन पाहणे ही त्यांची प्रषासकीय जबाबदारी असतांना त्यांनी देखील त्यात शामील होवुन सदर देयकांची रक्कम बी. वाय. षाह फर्मचे ठेकेदार सोहेल अब्दुल रहेमान मासुमअली शाह यांना अदा करून गुन्हेगारी वर्तन करून स्वतःचा आर्थिक फायदा करून शासनाचे तसेच मालेगांव महानगर पालिकेच्या निधीतील रक्कम रू. 20,68,607 /- (वीस लाख अडुसश्ठ हजार सहाशे सात रूपये) चे आर्थिक नुकसान (अपहार) केल्याचे चौकशी दरम्यान निष्पन्न होत आहे. तरी प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक सन 1988 चे कलम 13 (1) (अ) सह व भा.दं.वि. कलम 409, 420, 468, 471, 34 अन्वये फिर्याद आहे.

समक्ष

हि फिर्याद लिहुन दिली
सही.



Scanned with OKEN Scanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
RAJENDRA Pralhad PATIL(I (Inspector)) / PNMAH51049 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Patil

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
छावणी पोलीस स्टेशन
मालेगांव, जि नाशिक ग्रा.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAJENDRA Pralhad F
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH51049



Scanned with OKEN Scanner